REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# रोकडविरहीत भारतीय अर्थव्यवस्था फायदे आणि आव्हाने

प्रा.डॉ.रामा संभाजी वानखेडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख , डी.डी.एस.पी.कॉलेज एरंडोल, जि.जळगांव.

## प्रस्तावना :



मा.पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेबर २०१६ रोजी देशातील ५०० आणि १००० रुपयाच्या चलनी नोटा विनीमयातून रद्द केल्या.या चलनाचे एकूण चलनाशी असलेले प्रमाण जवळपास ८३ % होते.एवढया मोठया प्रमाणावरील चलन विनीमयातून बाद झाल्यामुळे देशातील लोकांना असंख्य अडचणींना सामोरे जावे लागले.कित्येक लोकांना यामध्ये जीव सुध्दा गमवावा लागला.सरकरचा जो यामागचा हेतू होता तो देखील पूर्णपणे साध्य झाला नाही.तरी देखील या निर्णयाचा एक फायदा असा झाला की, भारतीय अर्थव्यवस्था रोकडविरहीत करण्याचा दृष्टीकोन समोर आला.कारण विनीमयातील चलन रद्द झाल्यामुळे रोकडविरहीत व्यवहार करणे क्रमप्राप्त ठरले.यातूनच " Digital India " ही संकल्पना पुढे आली.पण ही संकल्पना प्रत्यक्षात खरी ऊतरवणे एवढे सहज शक्य नव्हते.

" Digital India " ही संकल्पना केंद्रीय मंत्रालयाने २० ऑगस्ट २०१४ रोजी स्विकारली होती.पण तीची प्रत्यक्षात अमलबजावणी १ जुलै २०१५ रोजी मा.पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी केली.पुढील ४ ते ५ वर्षात या योजनेवर सुमारे १ लाख कोटी रु.खर्च करण्याचे सरकारने निश्चीत केले होते.या " Digital India " चा मुख्य हेतू रोकडविरहीत अर्थव्यवस्था निर्माण करणे हा होता.नोटबंदीनंतर याचे चांगले परिणाम सुध्दा दिसून आले.पण भारतीय व्यक्तींना रोख व्यवहार करण्याची सवय लागलेली असतांना एकदम रोकडविरहीत व्यवहार करणे एवढे सोपे नव्हते.अर्थव्यवस्थेत नवीन रोख चलनाची ऊपलब्धता जशी वाढली तसा भारतीय व्यक्ती रोकडविरहीत व्यवहारपासून दुर जावू लागला.पण या व्यवहारात पुन्हा वाढ व्हावी म्हणून भारत सरकार,रिझर्व्ह बँक व भारतातील व्यापारी आणि खाजगी क्षेत्रातील बँका ज्या प्रयत्न करीत आहेत त्यामुळे रोकडविरहीत अर्थव्यस्था वाढण्यास मदत मिळत आहे.

## रोकडविरहीत अर्थव्यवस्थेचा अर्थ

रोकडविरहीत अर्थव्यवस्था याचा अर्थ जास्तीत जास्त डिजीटल पध्दतीचा वापर आणि रोजच्या व्यवहारात रोख रक्कमेचा कमीत कमी वापर असा होतो.दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाले तर रोख रक्कमेचा तुटवडा किंवा पुरवठा असा नाहीतर डिजीटल व्यवहारांचा जास्तीत जास्त ऊपयोग,जसे की डेबीट कार्ड,इंटरनेट बँकींग आणि मोबाईल फोनवरील ॲपव्दारे केलेले व्यवहार असा होतो.

डॅनियल एट अल (२००४) - अशी आर्थिक व्यवस्था की, ज्यात व्यवहार प्रामुख्याने प्रत्यक्ष रोख रकमेच्या बदल्यात केले जात नाहीत.

यावरुन असे लक्षात येते की, विनीमय व्यवहार करतांना रोख रकमेचा कमीत कमी वापर आणि डिजीटल माध्यमांचा जेंव्हा जास्तीत जास्त वापर केला जातो तेंव्हा त्यास रोकडविरहीत अर्थव्यवस्था असे म्हणतात.

## पूर्वसंशोधन साहित्याचा आढावा

रोकडविरहीत भारतीय अर्थव्यवस्थेवर या अगोदर ज्या संशोधकांनी संशोधन केलेले आहे त्याचा आढावा या ठिकाणी घेतलेला आहे.यामध्ये प्रामुख्याने संशोधनपर लेखाचा आढावा घेतलेला आहे.

१) गुप्ता आणि अरोरा (२०१५) - यांनी डिजीटल इंडीयाचे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम याचा अभ्यास केला.या अभ्यासात त्यांना असे आढळून आले की, भारतसरकारने कृषी क्षेत्रात व्यावसायाकतेचे गुण विकसीत करण्यासाठी अनेक योजना सुरु केलेल्या आहेत.या सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी व त्यावर आलेली सब्सिडी देण्याकरीता डिजीटल पध्दतीचाच वापर केलेला आहे.
२) राणी (२०१६) - यांनी डिजीटल इंडीया या संकल्पेतून अनेक संधी कशा निर्माण होतील याचा अभ्यास केला.विशेषतः माहीती तंत्रज्ञान क्षेत्रात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील असा निष्कर्ष काढला.
३) मिधा (२०१६) - यांनी डिजीटल इंडीया ही एक भारतातील ऊत्कृष्ट कल्पना असल्याचे म्हटले आहे.पण योजना राबवतांना संसाधनांची कमतरता असल्यामुळे ही योजना यशस्वी झालेली दिसून येत नाही.संसाधनाच्या कमतरतेमुळे व माहीतीच्या अभावामुळे फार मोठया प्रमाणात अनेक समस्यांना तोंड दयावे लागत आहे.असा त्यांनी निष्कर्ष काढला.

## संशोधन पध्दती -

प्रस्तुत संशोधनपर लेखासाठी दुय्यम आधार सामुग्रीचा वापर केलेला आहे.यामध्ये प्रामुख्याने संशोधनपर लेख, संदर्भग्रंथ, नियतकालीके,वर्तमानपत्रे व इंटरनेटचा आधार घेतलेला आहे.

## अध्ययनाची उद्दिष्टये -

प्रस्तुत शोधनिबंधासाठी पुढील उद्दिष्टये निश्चीत केलेली आहेत.
१) रोकडविरहीत अर्थव्यवस्था या संकल्पनेचा अभ्यास करणे.
२) रोकडविरहीत अर्थव्यवस्थेचे महत्व अभ्यासणे.
३) रोकडविरहीत अर्थव्यवस्थेतून निर्माण होणाऱ्या फायदयांचा अभ्यास करणे.
४) रोकडविरहीत अर्थव्यवस्था निर्माण करतांना येणाऱ्या अडचणींचा आढावा घेणे.

## रोकडविरहीत अर्थव्यवस्था - भारतातील वस्तूस्थिती -

रोकडविरहीत अर्थव्यवस्था निर्माण करतांना सद्यस्थितीत भारतात रोखीने किती व्यवहार होतात व रोकडविरहीत (कॅशलेश) किती व्यवहार होतात याचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

- सद्यस्थितीत भारतातील ७८ % ग्राहक वस्तूची खरेदी विक्री रोखीने करतात.
- यामध्ये सुध्दा किरकोळ क्षेत्रातील ९७ % वस्तूंची खरेदी विक्री ही रोखीने होते.
- केवळ २२ % व्यवहार हे भारतात रोकडविरहीत (कॅसलेस) पध्दतीने होतात.यासाठी एटीएम कार्ड, इंटरनेट बँकींग, मोबाईल बँकींग ईत्यादीचा वापर होतो.

**तक्ता क्र.१**
**रोखीने व्यवहार करण्याचे विविध देशातील प्रमाण**

| अनु क्र. | देशाचे नाव | रोखपैशाचे व्यवहार करण्याचे प्रमाण | रोकडविरहीत व्यवहार करण्याचे प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | बेल्जीयम | ७ % | ९३ % |
| २ | फ्रान्स | ८ % | ९२ % |
| ३ | कॅनडा | १० % | ९० % |
| ४ | स्वीडन | ३ % | ९७ % |
| ५ | इंग्लड | ११ % | ८९ % |
| ६ | भारत | ७८ % | २२ % |

Source - Journey towards Cashless India ( Eolas Edu.& Publication New Delhi ) P.No.111

तक्ता क्र.१ वरुन असे लक्षात येते की, इतर देशाशी तुलना करता भारतातील रोखीने व्यवहार करण्याचे प्रमाण खुप जास्त आहे.त्यामुळे भारतात काळा पैसा निर्माण होण्यास अधिक वाव मिळतो.

### भारतातील रोखपैशाचे GDP असलेले प्रमाण -

रोखपैशाचे GDP असलेले प्रमाण ज्या देशात कमी असते तो देश विकासाकडे वाटचाल करणारा देश म्हणून गणला जातो.जागतीक स्तरावरील विकसीत देशाशी तुलना करता भारतातील रोखपैशाचे GDP असलेले प्रमाण खूप जास्त आहे.ही एक नकारात्मक बाब भारतीय अर्थव्यवस्थेबाबत सांगता येते.

**तक्ता क्र.२**

**विविध देशातील रोखपैशाचे GDP असलेले प्रमाण**

| अनु.क्र. | देश | GDP शी रोखपैशाचे प्रमाण |
|---|---|---|
| १ | स्वीडन | १.७३ % |
| २ | द.आफ्रिका | २.३९ % |
| ३ | यु.के. | ३.७२ % |
| ४ | ब्राझील | ३.८२ % |
| ५ | भारत | १०.८६ % |

Source - Journey towards Cashless India ( Eolas Edu.& Publication New Delhi ) P.No.112

वरील तक्ता क्र.२ मधील देशातील स्वीडन या देशासोबत तुलना करता भारतातील रोखरक्कमेचे GDP असलेले प्रमाण ९ % नी जास्त आहे.पण ५०० व १००० रुपयाच्या चलनी नोटा रद्द केल्यामुळे हे प्रमाण घटण्यास मदत मिळेल अशी अपेक्षा आहे.

वरील वस्तूस्थिती असतांना देखील भारत सरकारने रोकविरहीत अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी जे प्रयत्न केलेले आहेत त्यातून अनेक फायदे सुध्दा भारतीय अर्थव्यवस्थेला होत आहेत.

### नोटबंदीनंतर ऑनलाईन व्यवहारात झालेली वाढ -

नोटबंदीनंतर ऑनलाईन व्यवहारात प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे.याची माहीती पंतप्रधानांनी दिलेल्या वेबसाईटवरती ऊपलब्ध आहे.या आकडेवारीवरुन पुढील तथ्य समोर येतात.

- २०१३-१४ या वित्तीय वर्षात बँकेव्दारे होणारे व्यवहार २५४.५ कोटी रुपयाचे होते ते २०१६-१७ मध्ये ८५९.९ कोटी रुपयापर्यंत वाढले.
- निती आयोगाचे मुख्य सल्लागार श्री.रतन वाटल यांच्या मते २०१५-१६ मध्ये एकूण व्यवहारापैकी डिजीटल पध्दतीने होणारे व्यवहार २४.५ टक्के होते ते २०१६-१७ मध्ये ५५ टक्यापर्यंत वाढले.
- या साईटवरती पुढे असे म्हटलेले आहे की, २०१३-१४ मध्ये मोबाईल बँकींगव्दारे होणारे व्यवहार २२४ कोटी रुपयाचे होते.ते २०१६-१७ मध्ये १०५७२ कोटी रुपयापर्यंत वाढले.
- ब्रॉडबँड कनेक्शन केबलच्या लांबीचे प्रमाण २०१३-१४ मध्ये ३५८ कि.मी. एवढे होते ते २०१६-१७ मध्ये २,०५,४०४ कि.मी.पर्यंत वाढले.

यावरुन असे लक्षात येते की रोकडविरहीत अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी भारत सरकारने जे प्रयत्न केलेले आहेत त्या प्रयत्नांना यश मिळत आहे.या पध्दतीने होणाऱ्या व्यवहाराचे अनेक फायदे आहेत त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

### रोकडविरहीत अर्थव्यवस्थेपासून निर्माण होणारे फायदे -

भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते.पण त्याला काळापैसा, भ्रष्टाचार, दहशतवाद, बेकायदेशीर मालमत्ता यांचे ग्रहण लागलेले आहे.यावर उपाय म्हणून रोकडविरहीत अर्थव्यवस्था निर्माण होणे आवश्यक आहे.या दृष्टीने भारतीय अर्थव्यवस्थेत पावले देखील ऊचलली गेली आहेत.या व्यवहारातून भारतीय अर्थव्यवस्थेला जे फायदे होतात त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

LBP PUBLICATION

• पैसे देण्याची सोपी पध्दत - कुठल्याही व्यवहारात पैसे अदा करण्याची पध्दत आता रोकडविरहीत होत आहे.रोकडविरहीत अर्थव्यवस्था कमी उत्पन्न गटापासून ते उच्चउत्पन्न गटापर्यंत सर्वांच्याच फायदयाची आहे.त्यामुळे व्यवहार शुल्क कमी होतो व रोख पैसे बाळगावे लागत नाहीत.

• कमी जोखीम - सायबर सुरक्षेमुळे ऑनलाईन पेमेंट सुरक्षित व जोखीम विरहीत आहे.कारण रोख पैसे बाळगण्यात नेहमी जोखीम असते.

• नोटा छापण्याच्या खर्चात कपात - रोकडविरहीत अर्थव्यवस्थेमुळे नोटा छापण्याचा खर्च वाचतो.२०१५ मध्ये नोटा छापण्यास रिझर्व्ह बँकेला २७ अब्ज रुपये खर्च आला होता.हा खर्च रोकडविरहीत अर्थव्यवस्थेमुळे कमी होईल.

• गुन्हयाचे प्रमाण घटेल - इलेक्ट्रॉनीक व डिजीटल व्यवहारामुळे नोटा बाळगाव्या लागणार नाहीत.त्यामुळे ईतर गुन्हे तर कमी होतीलच.शिवाय अमलीपदार्थ, तस्करी, दहशतवादाला अर्थपुरवठा, काळयापैशाची साठवणूक हे गुन्हे देखील कमी होतील.

• बँकींग क्षेत्राला लाभ - डिजीटल अर्थव्यवस्थेचा लाभ हा बँकिंग प्रणालीस होतो.लोक डिजीटल पेमेंट करत असल्यामुळे लोकांचे बँकेतील ठेवीचे प्रमाण वाढले.यामुळे गृहकर्जावरील व्याजदर देखील कमी होण्यास मदत मिळाली.

• पारदर्शकता व देखरेख - रोकडविरहीत व्यवहारांवर सरकार सहज लक्ष्य ठेवू शकते.त्यामुळे कर चुकवेगिरी टाळता येते. म्हणून सरकारच्या करमहसुलात वाढ झालेली आहे.

• रिअलईस्टेटच्या किंमतीवर परिणाम - रोखीने व्यवहार होत असतांना या व्यवहारातून फार मोठया प्रमाणावर काळा पैसा निर्माण होत होता.पण रोकडविरहीत व्यवहारांमुळे याला आळा बसलेला आहे.

• कार्यक्षमता वाढेल - व्यक्तीच्या खात्यामध्ये थेट रक्कम जमा होत असल्यामुळे पारदर्शकता वाढलेली आहे.त्यामुळे फार मोठया प्रमाणात मध्यस्थांची साखळी कमी झालेली आहे.

• भांडवलाची उपलब्बता - रोकडविरहीत अर्थव्यवस्थेमुळे बँकेकडील भांडवलाची उपलब्धता वाढली.त्यामुळे भारतातील लघु व कुटीरउद्योगांना कमी दरामध्ये कर्जपुरवठा करणे शक्य झाले.

रोकडविरहीत अर्थव्यवस्थेमुळे वरील फायदे मिळत असले तरी ही अर्थव्यवस्था निर्माण करतांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे.त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

## रोकडविरहीत अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने -

• भारतातील फार मोठा वर्ग बँकींग व्यवहारापासून दुर आहे.२०१५ च्या आकडेवारीनुसार हा आकडा २३३ मिलीयन लोकांचा होता.शिवाय जी लोकसंख्या डेबीट व आणि क्रेडीट धारक आहे त्याचा वापर होण्यासाठी केवळ १.४६ मिलीयन पॉईंट सेल उपलब्ध आहेत.त्यामुळे याचाही फायदा होत नाही.

• भारतातील ९० टक्के कामगार वर्ग देशातील ५० टक्के उत्पादन घेतो आणि हा सर्व वर्ग असंघटित क्षेत्रातील आहे.त्यांना बँकींग क्षेत्राची फारशी माहीती देखील नाही.

• भारतातील बहुतांश विक्रेत्यांना ऑनलाईन बाबींमधील व्यवहारांची नोंद ठेवण्यास स्वारस्य नसते.त्यामुळे ते रोखीने व्यवहार करण्यालाच प्राधान्य देतात.

• भारतातील ७३ टक्के लोकसंख्येकडे आजही इंटरनेटच्या सुविधा उपलब्ध नाहीत.भारतातील ग्रामीण भागात केवळ १३ टक्के लोकसंख्या इंटरनेट वापरते.बाकी लोकांना याची फारशी माहीती देखील नाही.तर शहरी भागातील केवळ ५८ टक्के लोकसंख्या इंटरनेट वापरते.

• सद्यपरिस्थीत भारताची लोकसंख्या १३० कोटी आहे.यापैकी ४० टक्के लोकसंख्येला आजही विजेचा पुरवठा होत नाही.त्यामुळे अशा भागात रोकडविरहीत व्यवहार कसे होणार हा प्रश्न निर्माण होतो.

• भारतातील ३० टक्के लोकसंख्या आजही दारिद्रयरेषेखाली जीवन जगत आहे.त्यामुळे ही लोकसंख्या नेहमीच या व्यवहारांपासून दूर राहील.

• भारतात रोकडविरहीत अर्थव्यवस्था वृध्दींगत होण्यासाठी जनधन खाते उघडण्यात आले.पण यातील बहुतांश खात्यावर व्यवहाराच करता येत नाहीत.त्यामुळे रोकडविरहीत व्यवहार कसे होतील असा प्रश्न निर्माण होते.

• भारतात मोठया प्रमाणात किरकोळ विक्रेते आहेत.त्यांची उलाढाल खुप कमी असते.त्यांना या रोकडविरहीत अर्थव्यवस्थेतील संसाधनावर गुंतवणूक करता येणे शक्य नाही.

• आज भारतातील बहुतांश बँकांनी क्रेडीट कार्ड व डेबीट कार्ड धारकावर अनेक प्रकारचे शुल्क आकारले आहेत.त्यामुळे याचा वापर हळुहळू कमी होतांना दिसत आहे.

• रोकडविरहीत व्यवहार करतांना अनेक सायबर गुन्हे झालेले दिसून येतात.त्यामुळे सर्वसामान्य व्यक्तींचा यावर विश्वास बसणे कठीन आहे.

**सारांश -**

वरील आव्हानांचा पाठलाग करतांना भारतात रोकडविरहीत अर्थव्यवस्था निर्माण कशी होणार यावर प्रश्नचिन्ह निर्माण होतात.यासाठी सरकारी पातळीवर मोठे प्रयत्न होतांना दिसतात.यासाठी सरकारने सामान्यांसाठी नशीबवान ग्राहकयोजना व व्यापाऱ्यांसाठी डिजीधन योजना सुरु केली.या योजनेअंतर्गत अनेक प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात येतात.सरकारने पुढे वित्तीय साक्षरता अभियान राबविले यात शाळा व कॉलेजमार्फत जनजागृती कार्यक्रम हाती घेण्यात आले.दुकाने, कॅटींग या सेवांमध्ये कॅसलेश व्यवहारांवर भर देण्यात आला.३१ डिसेंबर २०१६ रोजी पंतप्रधानांनी BHIM ॲप सुरु केले.त्यामुळे ऑनलाईन व्यवहार करणे अधिक सुलभ झाले.द नॅशनल कार्पोरेशन ऑफ इंडीयाने रुपे कार्ड जनधन योजनेत सुरु केले.हे रुपेकार्ड तीन मार्गाने चालते.त्यात एटीम,पीओएस व ऑनलाईन यांचा समावेश आहे.तसेच २५ डिसेंबर २०१६ रोजी आधार संचलीत पेमेंट ॲप सुरु केले.यात बायोमॅट्रीक रीडरचा वापर असून आधार क्रमांक टाकून व्यवहारासाठी बँकेची निवड करता येते.फोनशिवाय देखील यातून पेमेंट काढता येते.या सर्व ऊपायावरुन असे लक्षात येते की, भारतात स्वीडन सारख्या देशाप्रमाणे कॅसलेश व्यवहार होण्यास अनेक अडचणी आहेत.पण तरी देखील शासनाच्या वरील प्रयत्नांमुळे कॅसलेस व्यवहार करणाऱ्यांचे प्रमाण वाढलेले आहे.ही एक विकासाच्या दृष्टीने चांगली बाब याठिकाणी सांगता येते.

**संदर्भग्रंथ -**

१) रंजन कोळंबी (२०१४) - भारतीय अर्थव्यवस्था - भगीरथ प्रकाशन,पुणे.

२) प्रणव सखदेव (२०१७) - स्मार्टपणे व्हा कॅशलेश - रोहन प्रकाशन पुणे.

३) पटनाईक बी.के. (२०१७) - निश्चलीकरण, रोकडविरहीत अर्थव्यवस्था आणि विकास - योजना (फेब्रुवारी २०१७)

४) योजना मासीक - अंक ७, फेब्रुवारी २०१७

५) अर्थसंवाद त्रैमासीक - खंड ४०, अंक ३, ऑक्टोबर - डिसेंबर २०१६.

६) Jayant Parikshit ( 2018 ) - Journey Towards Cashless India - Eolas Education and Publication New Delhi

LBP PUBLICATION